## प्रेस नोट ता.१७/१०/२०२०

## महागड्या मोटार सायकली चोरी करणारी अंतरराज्यीय टोळी जेरबंद, ७ गुन्हे उघडकीस

## पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

दि.०३/१०/२०२० रोजी पहाटेच्या वेळी चिखली पोलीस ठाणे हद्दीतील नेवाळेवस्ती येथुन एकाच वेळी दोन बुलेट मोटार सायकली चोरीस गेल्या होत्या. त्यानुशंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांचे पथकाने गुन्ह्याचे ठिकाणी व इतर ठिकाणी असलेल्या सी.सी. टिव्ही फुटेज वरून आरोपीचा येण्या जाण्याचा मार्ग काढुन गुन्ह्याचे ठिकाणचे वेगवेगळ्या मोबाईल टॉवरचे तांत्रिक विश्लेषण करून त्यामध्ये प्राप्त झालेल्या माहितीवरून वरून आरोपींचा माग काढुन आरोपी **१) अमरेश किसन चव्हाण, वय १९ वर्षे, रा. संध्या डुडुळगाव, मोशी, पुणे (मुळगाव कर्नाटक)** यास मोशी येथुन तब्यात घेतले. त्याचेकडे केले तपास व तांत्रिक बाबींची पडताळणी करून आरोपी **२) किरण नुरसिंग राठोड, वय २० वर्षे, रा. वडगाव, ता.मावळ, जि.पुणे (मुळगाव कर्नाटक) ३) करण अर्जुन कुऱ्हाडे, वय १९ वर्षे, रा.साईसमर्थनगर, वडगाव, ता.मावळ, जि.पुणे** यांना तळेगाव येथुन ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे तपास करता त्यांची व त्याचे कर्नाटक राज्यातील दोन साथीदारसह पुणे व पिंपरी चिंचवड परीसरामधुन मोटार सायकली चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना हिंजवडी पोलीस ठाणे कडील मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्यामध्ये अटक करून त्यांची दि.१८/१०/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे.

आरोपीकडे तपास करता अटक आरोपी व त्यांचे कर्नाटक येथील दोन साथीदार यांनी पिंपरी चिंचवड व पुणे परीसरातुन बुलेट, एफ.झेड, पल्सर अशा महागड्या मोटार सायकली चोरी करून त्या देवदुर्गा, जि.रायचुर, कर्नाटक राज्य येथील गावी विक्री साठी नेवुन ठेवल्याचे उघड झाले. त्यानुसार पोउनि काळुराम लांडगे यांचे पथक सलग चार दिवस देवदुर्गा, जि.रायचुर, कर्नाटक राज्य या परीसरात थांबुन आरोपी यांचे पाहीजे साथीदार यांचे घरात व इतर वेगवेगळ्या ठिकाणी लपवुन ठेवलेल्या **२ बुलेट मोटार सायकली, ३ एफ.झेड, २ पल्सर, १ पॅशन अशा एकुण ८ मोटार सयाकली कि.रू. ७ लाख ५० हजाराच्या** हस्तगत करण्यात आल्या आहेत. हस्तगत करण्यात आलेल्या मोटार सायकली बाबत अधिक तपास करता त्याबाब खालील प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे.

१) चिखली ३६३/२०२० भादवि कलम ३७९ **(बुलेट)**
२) चिखली ३६४/२०२० भादवि कलम ३७९ **(बुलेट)**
३) तळेगाव दाभाडे ४५१/२०२० भादवि कलम ३७९ **(एफ.झेड)**
४) तळेगाव दाभाडे ४४५/२०२० भादवि कलम ३७९ **(एफ.झेड)**
५) हिंजवडी ५३०/२०२० भादवि कलम ३७९ **(पल्सर)**
६) हिंजवडी १०८०/२०१९ भादवि कलम ३७९ **(पॅशन)**
७) पिंपरी ६१०/२०२० भादवि कलम ३७९ **(पल्सर)**

अटक आरोपी यांचे कर्नाटक येथे राहणारे दोन साथीदार हे कर्नाटक येथुन येवुन अटक आरोपी यांचे मदतीने पिंपरी चिंचवड शहरात फिरून बुलेट, एफ.झेड, पल्सर अशा महागड्या मोटार सायकली चोरी करून त्या मोटार सायकली विक्री साठी कर्नाटक येथे घेवुन जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. अटक आरोपी करण कुऱ्हाडे हा मुळचा तळेगाव येथील रहीवाशी असल्याने त्याला पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्याची संपुर्ण माहिती असल्याने आरोपी हे त्यास गाडी चोरी करण्यास व गाडी चालविण्यास बरोबर घेवुन जात असे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री सुधिर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहा.पोली निरीक्षक गणेश पाटील, पोलीस उप निरीक्षक काळुराम लांडगे, सपोफौ रविंद्र राठोड, रविंद्र गांवडे, तसेच पोलीस कर्मचारी पोलीस कर्मचारी बाळु कोकाटे, अमित गायकवाड, महादेव जावळे, सोमनाथ बोऱ्हाडे, सुनिल चौधरी, प्रमोद हिरळकार, सचिन मोरे, अंजनराव सोडगिर, प्रमोद गर्जे, आनंदा बनसोडे, राजेंद्र शेटे, नागेश माळी यांचे पथकाने केली आहे.




सद्रक्षणाय खलनिग्रहणाय